MHAH250003082009

**दिवाणी दावा क्रं.१२०/२००९ मधील निशाणी ७८ वरील आदेश**

**(सावळेराम (मयत) व ई. वि. भाऊसाहेब गाडीलकर व ईतर)**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे प्रतिवादींनी दावा निकाली लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकत कुठल्याही प्रकारे हस्तांतर करु नये तसेच त्यावर बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकामी दिलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी केलेला असुन, दावा कलम १ मध्ये नमुद केलेली गट नं.१९७ यातील पुर्व बाजुकडील ० हे. ६१ आर ची जमीन वाद विषय असुन, त्यापैकी ४० आर क्षेत्र हे पुर्वी दगडू नाना गाडीलकर यांचे मालकीचे होते व त्यांना मुलबाळ नसल्याने त्यांनी त्यांचे क्षेत्रापैकी २० आर क्षेत्र वादीस व २० आर क्षेत्र प्रतिवादीचे वडिल रंभा यांना दिले. प्रतिवादी नंबर १ याने तो दगडू याचा दत्तक पुत्र असल्याचे नमुद करुन दगडू याचे जमिनीस स्वतःचे नांव लावले व त्या आधारे प्रतिवादी नं.५ बरोबर मिळकत विक्रीचा व्यवहार केला. सदरचे प्रतिवादी नं.१ हा दत्तकपुत्र नसल्याचे वादीने रे.मु.नं.१४६/१९९४ मध्ये शाबीत केले त्यावर सदरचे प्रतिवादी नं.१ ने अपील केले व त्याचा निकाल नुकताच ता.२४/०२/२०२२ रोजी झालेली असुन, मे.अपील कोर्ट यांनी कनिष्ठ कोर्टाचा निकाल कायम केला आहे.

३. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी नं.१ याने करुन दिलेले खरेदीखत हे संपुर्णतः बेकायदेशीर असल्याचे ठरावाने मान्य झाले असुन ते क्षेत्र वादीचे मालकीचे असल्याचे शाबीत झाले आहे व दरम्यानचे काळात प्रतिवादी नं.५ याने मिळकतीत ताबा केला असल्याने, सदरचे वादी यांनी दावा दुरुस्तीचा अर्ज देवुन, कब्जाची मागणी केली त्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजुर होवुन कोर्टाने प्रतिवादी नं.५ कडून मिळकतीचा कब्जा मिळणेबाबत दुरुस्ती मान्य केली. सदरची दुरुस्ती झाल्यानंतर नुकतेच प्रतिवादी नं.५ यांनी

दावा मिळकत ही बंद करुन ठेवली असुन त्या ठिकाणी कुठलेही उत्पादन चालु नाही व सदरचे प्रतिवादी नं.५ यांची कंपनी नुकसानीत आल्याने प्रतिवादी नं.५ हे घाईगडबडीने दावा मिळकत त्रयस्त इसमांस खरेदी देण्याचे प्रयत्नात आहे. त्याबाबत वादीने सदरचे मिळकतीचे प्रमुख दरवाजावर जाहीर नोटीसीची प्रतही लावलेली होती परंतु ती प्रत प्रतिवादी नं.५ चे अधिका–यांनी फाडनू त्रयस्त इसमांस जागा दाखवुन त्यांना मिळकत हस्तांतर करण्याचे प्रयत्न चालु केले असल्याने त्याप्रमाणे हस्तांतर केल्यास पुन्हा दाव्यामध्ये दुरुस्ती करुन वादीचे दाव्याचे चौकशीचे काम विनाकारण लांबणीवर पडण्याची भिती उत्पन्न झालेली आहे.

४. वादीचे पुढे कथन की, सदरचा दावा हा सन २००९ चा असुन सदरचे वादी याने सदर दाव्यामध्ये प्रतिवादीने कुठलाही कब्जा केला नसल्याचे वेळी सरतपासणीचे शपथपत्रही दि.१२/०६/२०१७ रोजी दाखल केलेले होते व त्यावर काही अंशी प्रतिवादी नंबर १ ने उलटतपासणीही घेतली होती व नंतर वेळोवेही सदरचे प्रतिवादींनी वेगवेगळया घटना केल्याने व मुदती मागितल्याने दाव्याचे कामकाज लांबवणीवर पडत आलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर प्रतिवादी नं.५ याने दावा मिळकतीबाबत कुठलेही खरेदी, विक्री अगर हस्तांतराचे व्यवहार केल्यास वादीचे अतोनात असे नुकसान होईल म्हणुन मुळ दाव्याचे निकालापावेतो प्रतिवादी नंबर ५ याने दावा मिळकतीबाबत कुठलेही खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, डिड अथवा अन्य कोणतेही हस्तांतराचे व्यवहार करुन नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देववावा ही विनंती.

५. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जाला त्यांचे लेखी म्हणणे देवुन आक्षेप घेतला आहे की, वादींचा अर्ज खरा नाही व तो या प्रतिवादींना मुळीच कबुल नाही. वादींचा अर्ज कायदेशीर नाही व अशा प्रकारचा अर्ज वादींना या स्टेजला देता येणार नाही. वादींनी अर्जात केलेले कथन की, रे.मु.नं.१४६/१९९४ वरील अपीलाचा निकाल होऊन त्यात कनिष्ठ न्यायालयाचा निकाल कायम करण्यात आला हे जरी खरे असले तरी त्यावर मा.उच्च न्यायालयात सेकंड अपील होऊन त्यात मा.उच्च न्यायालयाने अपील दाखल करुन स्थगिती आदेश दिलेला आहे ही बाब वादींनी हेतुपुरस्पर लपवुन ठेवलेली आहे. कंपनीचे स्थितीबाबत वादींना माहिती असण्याचे कारण नाही. वास्तविक वादींचा उलटतपास

झालेनंतर ते अनेक तारखांपासुन पुढील पुरावा देत नाहीत कारण वादींना मा.उच्च न्यायालयाने केलेल्या आदेशामुळे प्रकरणामध्ये कोणतेही तथ्य राहिलेले नाही याची कल्पना आलेली होती व आहे. परंतु तरीही या प्रकरणात प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम मिळवुन प्रकरण अनेक वर्षे प्रलंबित ठेवण्याकरिता सदरचा खोटा व चुकीचा अर्ज वादींनी दिलेला आहे जो रद्द करण्यात यावा व वादींना त्वरित पुढील पुरावा देण्याचा आदेश करण्यात यावा. वादींचा नि.५ चा अर्ज यापुर्वी देखील मा.जिल्हा न्यायालयाने गुणदोषावर फेटाळलेला होता त्यामुळे वादींचा सदरचा अर्ज चालु शकत नाही. सबब वादींचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन झाले आहेत व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजूने सुकृतदर्शनी प्रकरण असल्याचे वादी सिध्द करतात का? | नकारार्थी |
| २. | अनुकुलतेचा कल वादींच्या बाजुने आहे काय? | नकारार्थी |
| ३. | तात्पुरता मनाई हुकुम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल असे वादी सिध्द करतात का? | नकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश काय? | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता</u>**

७. उपरोक्त वाद प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुर्नरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीतपणे चर्चे करिता घेतले आहेत.

८. वादींचे विधीज्ञ श्री. एस. आर. बिहाणी व प्रतिवादी क्र.५ यांचे विधीज्ञ श्री.आर. एच. गांधी यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील

कथनांचा पुनःउच्चार केला.

९. अर्जाचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींनी आपसात करुन दिलेल्या खरेदीखत हे बेकायदेशीर असल्याने वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव मिळण्यासाठी दाखल केले आहे. वादी व प्रतिवादी यांच्या मुळ वाद हा मुळ वादीचे भाऊ दगडु यांनी प्रतिवादी क्र.१ यास दत्तक घेतले होते किंवा नाही या विषयी आहे. सदर वाद आज रोजी मा.उच्च न्यायालय येथे प्रलंबित असल्याचे कागदपत्राच्या आधारे दिसुन येते. दावा प्रलंबित असताना वादींचा पुर्वीचा नि.५ वरील मनाई हुकूमाचा अर्ज या न्यायालयाने व मा.जिल्हा न्यायालयाने फेटाळल्याचे देखील दिसुन येते. वादीने त्यांच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र २०१७ साली दाखल केल्याचे व त्यांचा उलटतपास दि.१५/११/२०२१ रोजी संपुर्ण झाल्याचे दिसुन येते. तेव्हापासुन दावा हा वादीच्या पुढील पुरावासाठी प्रलंबित आहे. दरम्यानच्या काळात दि.१८/०४/२०२२ रोजी वादीने दाव्यात दुरुस्तीचा अर्ज केल्याचे दिसुन येते. सदर दुरुस्ती अर्ज मंजुर झाल्यानंतर वादीने प्रस्तुतचा तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज दिला आहे.

१०. वादीचे विद्वान विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी नं.१ हा दगडु यांचा दत्तक पुत्र नसल्याचे दिवाणी दावा क्र.१४६/१९९४ च्या निकालामध्ये स्पष्ट झाले असुन सदरचा निकाल मा.जिल्हा न्यायालयाने अपीलामध्ये कायम ठेवला आहे. या उलट प्रतिवादी क्र.५ च्या विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, सदर जिल्हा न्यायालयाच्या निकालास त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे आव्हानीत केले असुन सदर जिल्हा न्यायालयाच्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने अपील अॅडमीट करुन स्टे दिला आहे. सदर कथनाच्या पुष्ठार्थ त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या दि.०६/०५/२०२४ रोजीच्या आदेशाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हा दगडु यांचा दत्तक पुत्र नाही याचा अंतीम निकाल झाला आहे असे सद्यस्थितीला म्हणता येणार नाही.

११. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.५ यांची कंपनी डबघाईला आली असुन ते सदर मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. परंतु त्यांच्या कथनाच्या पुष्ठार्थ त्यांनी कुठलाही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. प्रतिवादी क्र.५ ही कंपनी

असल्याची बाब नाकारता येत नाही. कुठल्याही कंपनीला एखादी मालमत्ता विकायची असल्यास कंपनी अॅक्ट मध्ये दिलेल्या तरतुदीची पुर्तता केल्या शिवाय ती विकता येणार नाही. प्रतिवादी क्र.५ ने तशी काही प्रक्रिया सुरु केल्याबाबत देखील अभिलेखावर कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. वादी हे सदर मिळकतीचे मालक आहेत हे अद्याप जाहीर झालेले नाही तसेच सदर मिळकतीचा ताबा देखील वादीकडे नाही. त्यामुळे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येणार नाही. तसेच वादी मागतात त्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे जास्त नुकसान होईल. याउपर ट्रान्सफर प्रॉपर्टी अॅक्ट च्या कलम ५२ चे संरक्षण वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम देता येणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, वरील कारणमिमांसेवरुन वादी हे तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मिळण्यास पात्र ठरत नसल्याने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u>**

**१२.** वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी दिले असल्यामुळे मुद्दा क्र.०४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

KANAKDANDE SHRIHARI

Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2025.08.28 17:40:35 +0530

(एस.आर.कनकदंडे)

दिनांकः– २८/०८/२०२५

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर**

**पारनेर, जि.अहमदनगर.**